Vol II Issue VIII Feb 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

# Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 8, Feb. 2013
**ISSN:-2231-5063**
Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# *दलित साहित्यातील स्त्रीचित्रण*

*वाल्मिक शंकर आढावे*

स्व.अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान
महाविद्यालय, म्हसदी, ता. साक्री जि. धुले

सारांश :—

दलित साहित्यातून दलित स्त्रीचे चित्रण हे एक कष्टाळू, दु:ख, दैन्य, दारिद्र्याशी करावा लागणारा संघर्ष असे आले आहे. हे चित्रण काल्पनिक नसून वास्तवदर्शी आहे. ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या मुलमंत्रांनी भारावलेली आहे. समाज परिवर्तनाचा ध्यास तिने घेतलेला आहे. तिने बौध्द धर्म स्वीकारला तरी सुध्दा ती हिंदु रुढी परंपरेच्या मानसिकतेतून पूर्णपणे बाहेर पडलेली जाणवत नाही. अंधश्रध्देच्या आहारी गेलेली साधी, भोळी, श्रध्दाळू, चातुर्वर्ण्य व्यवस्थेला बळी पडलेली स्त्री जाणवते. प्रस्थापित समाजाकडून सतत होणारा अन्याय, अत्याचार ती सहन करते. दलित स्त्रीला उदरनिर्वाहासाठी संघर्ष करावा लागतो. त्यामुळे इतर स्त्रीयांच्या भावविश्वापेक्षा एकूणच तिचे भावविश्व वेगळे जाणवते.

*विशेष शब्द-*

दलित स्त्री, कष्टमय जीवन, वेदना, विद्रोह, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन

### *प्रास्ताविक -*

प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुध्द विद्रोह, बंड, नकार आणि एल्गार म्हणजे दलित साहित्य. म. फुले, शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन हेच दलित साहित्याच्या प्रेरणास्थानी आहे. या साहित्यातील स्त्रीयांचे भावविश्व हे इतर मध्यमवर्गीय व सवर्ण स्त्रीयांच्या भावविश्वापेक्षा अगदी वेगळ्या स्वरुपाचे आढळते. तिचे आयुष्याचे सारे संदर्भ जगण्यामरण्याशी संघर्ष करण्यासाठीच येतात. डॉ. आंबेडकरांचा 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा विचार घेऊन ती जागृत होते आणि मुलांना शिकविते. दलित साहित्यात स्त्री जीवनाला फार गौण स्थान आहे. स्त्रीयांमुळे लेखक मोठे झाले, पण या स्त्रीया मात्र उपेक्षित राहिल्याचे आढळून येते. मध्ययुगीन काळात दलित स्त्रीयांची फारच परवड झाली. तिला लग्न समारंभ, मंदिर, गाव प्रवेश, पाणवठा, मसनवाटा इ. ठिकाणी प्रवेश नाकारण्यात आला. एवढेच नव्हे तर भागू महारीण, कान्होपात्रा यांची भक्तीच्या पवित्र क्षेत्रात पदोपदी हेटाळणी झाली. एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी म.फुले यांचा अपवाद वगळता बहुजन, दलित शुद्रातिशुद्रांच्या विषयी विचार करण्याचा, त्यांना न्याय देण्याचा कोणी फारसा प्रयत्न केला नाही. दलित स्त्रीचे दु:ख आणि तिच्यावर होणारा अन्याय १९६० नंतर उदयास आलेल्या मराठी दलित साहित्यामध्ये प्रकर्षाने जाणवतो.

### *दलित कवितेतील स्त्री -*

वामन निंबाळकर, दया पवार, नामदेव ढसाळ, ज.वि. पवार, अर्जुन डांगळे, अरुणकुमार इंगळे, भगवान भोईर, ज्योती लांजेवार इ. दलित कवींनी आपल्या आईचे कष्टाळू जीवन तिचे भोळेभाबडे रुप आपल्या कवितेतून साकार केले आहे. डॉ. आंबेडकरांच्या शिकवणुकीचा ध्यास घेऊन मुलांना शाळेत पाठवणारी स्वत: उपाशी राहून मुलांना खाऊ घालणारी अशी दलित आईचे हृदयद्रावक व मन हेलावून सोडणारे चित्रण दलित कवितेत आलेले आहे. दलित कवितेतील आई ही दलित माणसाच्या जगण्याची भावपूर्ण प्रतिमा आहे. तिच्या रुपाने दलित जीवनाचा साक्षात्कार घडतो. तिच्या ओबड धोबड चित्रात दलित जीवनाचे प्रतिबिंब अगदी हुबेहुब दिसते.

वामन निंबाळकरांची 'माय' ही कविता म्हणजे संपूर्ण दलितांच्या आईचे चित्रण आहे. लाकडाच्या मोळीवर उदरनिर्वाह करणाऱ्या आईचा संर्पदंश होवून मृत्यू होतो, हे दु:ख कवी पचवत आले आहेत. दया पवार आपल्या आईचे चित्रण रेखाटताना म्हणतात की, माझ्या आईने अपार कष्ट सोसले अनाथ आश्रमातील हॉस्टेलमध्ये भाकरी थापण्याचे काम केले. स्त्री धर्माच्या नैसर्गिक घटनाक्रमातही तिने विश्रांती घेतली नाही. सतत कष्ट करीत राहिली. अशा कष्टाळू स्त्रीचे चित्रण त्यांनी केले आहे. दलित कवींनी आईचे केलेले चित्रण काल्पनिक नसून वास्तवदर्शी आहे. तिच्या वाट्याला आलेले दु:ख, तिला सोसावे लागलेले कष्ट वेदना, दैन्य, दारिद्र्याशी करावे लागणारे दोन हात याचे मन हेलावून सोडणारे चित्रण दलित कवींनी आपआपल्या कवितेत केलेले आढळून येते.

दलित कवींच्या आईला छान छान गप्पा गोष्टी करता येत नाही. कारण ती बोलकी नसून कष्टाळू आहे. तिने समाज परिवर्तनाचा ध्यास घेतला आहे. तिला आधुनिकतेची समज आहे. त्यानुसार ती आपल्या मुलांना घडवित. हे तिचे मुकेपण, कर्तृत्वभावना मोठी लोभस वाटते.

'झाडांनी स्वत: तापायचं उन्हात
पर दुसऱ्यांना सावली द्यायचीङ्क

'आपून म्हणजे झाडचं की उन्हातलं' हे भगवान भोईर यांच्या 'उन्हातलं झाड' या कवितेतील आईचे उत्तर मोठे मनोवेधक व हृदयाला पिळ पाडणारे आहे.

**Title :** *दलित साहित्यातील स्त्रीचित्रण*
**Source:Golden Research Thoughts [2231-5063]** *वाल्मिक शंकर आढावे* **yr:2013 vol:2 iss:8**

DSpace™

कवयित्री ज्योती लांजेवार यांनी 'कधी दिसली नाहीस' या कवितेत आपल्या आईच्या कष्टमय जीवनाची यशोगाथा चित्रित केली आहे. त्या म्हणतात की, तू मला कधी छान इरकली लुगड्यात सोनेरी बांगड्या घालून नटलेली दिसली नाहीस. तुझ्या गळ्यात काळ्या मन्याची माळ, दंड घातले, जुनेर नेसून तू सतत रोजगार हमीच्या कामावर किंवा गवंड्याच्या हाताखाली सिमेंट काँक्रीटच्या इमारतीवर काम करतांना मला दिसलीस. थोडक्यात दलित कवीने कवितेत आईची विविध भावरुप साकार केली आहेत. प्रांजळपणा सहनशीलता, हृदयद्रावकता इ. वैशिष्ट्यांनी दलित कवितेतील आईचे चित्रण वाचकांना अंतर्मुख करते. दलित कवींच्या कवितेतील आईचे चित्रण इतर कवींपेक्षा सरस उतरले आहे. तिच्या दु:खाचे अनेक पदर त्यांनी उलगडून दाखविले आहे.

### ★ दलित कथेतील स्त्रीचित्रण -

दलित कथेतील स्त्रीचित्रणाचा आढावा घेताना आपणास ह्या स्त्रीयांच्या भोवती संपूर्ण दलित जीवन गुरफटून जातांना दिसते. शंकरराव खरातांच्या 'सांगावा' कथेतील साडूबाई, रामा महारांचा संवाद मोठा बोलका वाटतो. यातून रामा व साडूचा सारा संसार आपल्या डोळ्यापुढे उभा राहतो. दिवसभर काबाडकष्ट करुन लेकरांना पोटभर अन्न घालू न शकणारी साडू आणि रामा यांच्या जीवनातले संवाद वाचकांना अंतर्मुख करतात. साडू ही संपूर्ण दलित समाजाची नायिका आहे. याशिवाय धोंड्याबेरडांची बायको लक्षी आपल्या नवऱ्याला चोऱ्या, दरोड्याचा व्यवसाय करण्यास सांगते. परंतु त्याच्याऐवजी आपणच कुऱ्हाड घेऊन दरोड्याला निघते आणि धोंड्या बेरडांचा संसार नीट करते. 'टिटवीचा फेरा' या कथासंग्रहातील 'रोजगार' मधील गिरीजा मुलांच्यासाठी दारु विकायचे काम करते. 'पालकीचं दर्शन' कथेतील सुंद्री पोरांच्यासाठी सोंग घेऊन चोऱ्या करते. शंकरराव खरातांच्या कथेतील काही स्त्रिया गुन्हेगारी वळणाच्या आहेत. परंतु मुलांवर संस्कार करणाऱ्या त्यांना शाळा शिकविणाऱ्या आहेत. भाकरीसाठी चोऱ्यामाऱ्या करणाऱ्या आहेत. तर काही अंधश्रध्दाळू देवाला नवस करणाऱ्या उपास-तपास करुन जीवनातील भोग संपावेत असे वाटणाऱ्या आहेत. उर्मिला पवार यांच्या 'चौथी भिंत' कथेतील नानाची चुलती परिवर्तनवादी विचारांची स्त्री आहे. योगीराज वाघमारे यांच्या कथेतील स्त्रीया पोट भरण्यासाठी काबाडकष्ट करतात. तर कधी स्वैर जीवनात जगतात. 'अंधार' कथेतील बायजा माहेरी जाण्याचे नाकारते. 'हवेली' कथेतील सिताबाई आपली अब्रु लुटणाऱ्या म्हाताऱ्या पाटलाचा खून करते. योगीराज वाघमारे आपल्या कथेतील स्त्रियांची निवड करतांना धर्मभावना व सामाजिकता विचारात घेतात, म्हणून त्यांच्या कथेतील स्त्रिया कष्टाळू तर कधी पोटासाठी गैरमार्ग स्वीकारतात. परंतु त्याला परिस्थिती तशी असते. हे विसरुन चालणार नाही.

मराठी दलित कथाविश्वात अण्णाभाऊ साठे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. त्यांनी दलित समाजातील अठरा पगड जाती जमातीचे चित्रण आपल्या कथेत केले. त्याचबरोबर भटक्या विमुक्त जातीतील लोकांचे चित्रण त्यांनी केले. अण्णाभाऊंच्या कथेतील स्त्री ही मोठी विलक्षण विचार करणारी, खानदाणी, पवित्र मनाची, जीवाला जीव देणारी आहे. 'लाडी' कथासंग्रहातील चंदा, बिलवरी राधा, कृष्णा या धाडसी स्त्रीया आहेत. तर भुकेसाठी भांडणाऱ्या जातीच्या स्वाभिमानापोटी वळण बदलणारी चिमा महारीण, नवऱ्यापेक्षा भोमक्या सारख्या अक्राळविक्राळ माणसाबरोबर संसार करणारी सुंद्री यापेक्षा अण्णाभाऊंच्या स्त्रिया सुंदर, जगाला भुरळ पाडणाऱ्या व त्यांच्यामुळे गावातल्या तरुणात, गावगुंडात भांडणे होतात.

'सूड' या दीर्घकथेत बाबूराव बागुलांनी जानकीच्या माध्यमातून दलित स्त्रीची वेदना मांडली आहे. एक प्रकारे अखिल स्त्री जातीचा गौरव आहे. जानकी हे एक प्रातिनिधीक पात्र मानून अखिल स्त्री जातीच्या अत्याचाराची सुडाची ही कथा आहे. तसेच बंडखोर, स्वाभिमानी अशी स्त्री दादासाहेब मोरे यांनी आपल्या कथेत चित्रित केली आहे. अण्णाभाऊंच्या बरबाद्या कंजारीची पुढची पायरी गाठली आहे. अण्णाभाऊ बरबाद्यावर बहिष्कार घालून थांबतात. परंतु दादासाहेब मोरे लच्ची व धमन्याला या दुष्ट भ्रष्ट मानवी गुलामगिरीतून मुक्त करतात. हा विचार डॉ. आंबेडकरांच्या क्रांतीकारी विचारांच्या मुशीतून तयार झालेला आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील कथांमध्ये येणारी स्त्री ही सवर्णदलित संघर्षामध्ये होरपळणारी लाचार, दीनदुबळी, कष्ट उपसणारी, अठरा विश्व दारिद्र्यात पिचलेली स्त्री येतांना दिसते. अंधश्रध्दा जपणारी, मुलाबाळांवर जिवापाड प्रेम करणारी, फुले, आंबेडकरांचे संस्कार घेऊन आपल्या मुलांना घडविणारी दिसते. अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागुल यांच्या कथेत येणारी स्त्री स्वाभिमानी, धाडसे, गुणी, प्रामाणिक, संघर्षशील आपल्या मुलांसाठी नवऱ्यासाठी, घरासाठी घडपडणारी दिसते. स्वातंत्र्योत्तर काळातील दलित वर्ग मोठ्या प्रमाणात शिकला, उच्चपदस्थ नोकरीत आला. त्याने सवर्ण स्त्रीशी आंतरजातीय विवाह केला. आणि त्याची वेगळीच समस्या निर्माण झाली.

### ★ दलित आत्मकथनातील स्त्रीचित्रण -

स्त्री ही पायाची दासी, निर्जीव वस्तु, निर्बुध्द समजून पूर्वीच्या समाजाने तिला वागविले. चूल आणि मूल एवढेच तिचे जीवनक्षेत्र बनवले. अन्याय आणि अत्याचार, छळ सोसण्यासाठीच जणू तिचा जन्म. तिच्याजवळ निर्णयक्षमता नाही, असा स्त्री विषयी समाजाने समज निर्माण करुन घेतला होता. दलितांची स्त्री यापेक्षा वेगळी नाही. दलित समाजातील ती त्यातही दलित शोषीत, भरडली जाणारी, पिळली जाणारी स्त्री आहे, नवरा कसा का असेना त्याच्या संसाराचा गाडा पुढे रेटने यातच ती धन्यता मानत असे.

दया पवारांच्या 'बलुत' या आत्मकथनातील आईने नवरा दारुबाज व बाहेरख्याली असूनही त्याला साथ दिली. नवरा मेल्यावर तिने हिंमतीने आणि मोठ्या कष्टाने वाढविले. एकेकाळी खूप सुंदर असणाऱ्या बानूला तिचा नवरा सोडून देतो. परिणामी विड्याच्या कारखान्यात विड्या वळीत तिला आयुष्य कंठावे लागते. विठाबाई ही देखील अशी एक स्त्री आहे. मूलबाळ नसल्याने चक्क गरोदरपणाचे नाटक करते. यातील जमना मावशीचे दु:ख वेगळे आहे. तिचा देखणेपणा हाच तिचा दोष होता. त्यामुळेच शेवटी तिच्या वाट्याला वेश्या व्यवसाय येतो. बानू, गडू वडारीण, सलमा या लेखक दया पवारांवर प्रेम करणाऱ्या स्त्रिया, परंतु सामाजिक बंधनामुळे त्या मूक राहतात व प्राप्त परिस्थितीला सामोरे जातात. 'बलुत' आत्मकथेतील स्त्रिया विविध प्रकारच्या विविध स्तरावरच्या व्यथा, वेदना यातना सहन करुन जीवन जगणाऱ्या आहेत.

लक्ष्मण मानेंच्या 'उपरा' मधील आई ही व्यथा, वेदना आणि उपासमार सहन करणारी आहे. यातील न्यायपंचायतीच्या निवाड्यात खटल्याचे कारण झालेल्या स्त्रीचे व्यक्तिमत्व विचारात घेण्यासारखे आहे. अडीचशे रुपयासाठी एकाने दुसऱ्याजवळ बायकोला गहाण ठेवली होती. पैसे परत करुन ती बायको परत न्यायला गेला, तर तो कर्जाऊ रक्कम देणारा त्याला त्याची बायकोच परत देईना. एकंदरीत कैकाडी समाजात स्त्रीचं स्थान किती हीन दर्जाचे होते हे लक्षात येते. याठिकाणी स्त्री म्हणजे जणू एक गहाण ठेवण्याची आर्थिक व्यवहारातली वस्तू अशी मानलेली दिसते. कधी ती मूकजनावरासारखी तर कधी चप्पले, व्हान, जितरब इ. शब्दांनी संबोधलेली आहे. तिच्या मनाला, मातृत्वाला व वासनेला कवडीमोलाची किंमत नाही.

शांताबाई कांबळे यांच्या 'माज्या जल्माची चित्तरकथा' मध्ये शांताबाईचे रुप एक स्वावलंबी स्त्री म्हणून उभे राहते. नवरा शिक्षक असूनही त्यांना न कळवता दुसरी बायको करतो. ती मेल्यानंतर परत शांताबाईकडे येतो. मात्र ती डगमगत नाही. 'अक्करमाशी' या आत्मकथेतील स्त्रीया अतिशय दुर्दैवी वाटतात. ह्या पुरुषाकडून त्या पुरुषाकडे सतत हस्तांतरीत होणारी, नवऱ्याने सोडलेल्या तर वेश्यागत जीवन जगणारी, दारु विकून पोट भरणारी आणि डझणावारी मुलांना जन्म देणारी अशी ती स्त्री आहे. संतामाय, चंदामाय, मसामाय याही नवऱ्याने सोडलेल्या स्त्रिया आहेत.

'मु.पो. देवाचे गोठणे' मधील माधव कोंडविलकरांच्या आईला मुलाच्या बंडखोर विचारांमुळे सतत असुरक्षित वाटते. सवर्णांच्या दडपणाला ती घाबरते. कारण आपलं जगणं त्याच्यावर आहे, असे तिला वाटते. स्त्रीच बऱ्याचदा स्त्रीची शत्रू असते, याची अनुभूती 'जिणं आमुचं' मध्ये येते. लग्नाचं धड वयही नसलेल्या मुलीचं लग्न करण्यात येते. लग्न होऊन ती सासरी नांदायला म्हणजे तिचा कसा छळ होत असे याचे वर्णन बेबी कांबळे यांनी केले आहे. 'कोल्हाट्याचं पोर' मध्ये किशोर काळे यांच्या कलावंत आईने सोनपेठच्या कृष्णराव कडकर यांची रखेली म्हणून राहणे स्वीकारले, आईबाप आणि स्वत:चा मुलगाही सोडून ती त्यांच्याकडे उभं तारुण्य घालवून राहिली. पण कृष्णराव तिला मारीत, छळीत असतं. थोडक्यात आधीच दलितांचे जीवन कष्टमय, यातनामय, दु:खभोगी त्यातही दलित स्त्रीचं दु:ख अधिक तीव्र आहे.

### ★ दलित कादंबरीतील स्त्री चित्रण -

ना.रा. शेंडे, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, शंकरराव सरुडकर, ही.गो. बनसोडे, हरिभाऊ पगारे, ना.ब. जाधव, बाबूराव बागुल, केशव मेश्राम इ. दलित साहित्यिकांनी दलित कादंबरीतून स्त्री जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण केलेले आहे. ना.रा. शेंडे यांनी 'काजळी रात्र', 'तांबडा दगड', 'विलासिनी', 'अन्शुजा' व 'गायत्री' इ. कादंबऱ्यांतून

स्त्री जीवनाचे चित्रण केले. 'गायत्री' मधून तत्कालीन स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार, तिच्या मनाचा होणारा कोंडमारा, अधोरेखीत केलेला आढळून येतो. आदिवासी स्त्रीचे चित्रण 'तांबडा दगड' मध्ये केलेले असून 'विलासिनी' मध्ये अध्यात्म आणि संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर स्त्रियांचे दर्शन घडविले. 'काजळी रात्र' मध्ये भावनिक पातळीवरचे ऐक्य प्रतिपादले आहे. दलित साहित्यात अण्णाभाऊ साठे यांनी मोठ्या प्रमाणात कादंबरीलेखन केले. 'वारणेचा वाघ' कादंबरीत सईला सवर्ण चौगुलाचा लाथा बुक्यांचा खावा लागलेला मार, 'चित्रा' कादंबरीत दारिद्र्यामुळे चित्राला विकावे लागणारे शील, परिस्थितीमुळे चित्रा, सोनाला मुंबईत येऊन इच्छा नसतांना करावा लागणारा देहविक्रीचा धंदा, प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करणारी 'वैजयंता' मधील वैजयंता, याशिवाय स्त्रियांच्या कुचंबणेचा, प्रेम, प्रणयाचे संघर्षमय चित्रण अण्णाभाऊंनी स्त्रियांच्या सामाजिक जीवनातील स्थान, त्यांची बाणेदारवृत्ती, धाडसी स्वभाव इ. वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकलेला दिसून येतो.

शंकरराव खरातांच्या 'हातभट्टी' या कादंबरीतून दलितांच्या लाचार जीवनावर प्रकाश टाकला आहे. उदरनिर्वाहासाठी झोपडपट्टीत लोक दारु विकण्याचा व्यवसाय करतात. दारुमुळे जातीजातीत संघर्ष निर्माण होतो. स्त्रियांची अब्रु वेशीला टांगली जाते, असे चित्रण त्यांनी केलेले आहे. प्रा.केशव मेश्राम यांनी 'जटायू' मध्ये अभिमनवर प्रेम करणारी सवर्ण प्रियेशी उर्मिला दामले, अभिमनची आई, अठरा एकोणीस वर्षांची मुलगी तिला गंगनबाबा आपल्या अघोरी विद्येद्वारे तिच्या अंगावरील भूत काढतात. एवढेच नव्हे तर तिला बेशुध्द होईपर्यंत मारतात. धूपारा देतात. संधी मिळेल तसे तिला खाली वर तपासून घेतात. अशा अंधश्रध्दातून स्त्री यांची चित्रणे आढळून येतात. बाबुराव बागुलांची 'सूड' मधील 'जानकी' स्त्री जीवनाचा नाश करुन अन्याय अत्याचार करणाऱ्या पुरुषी जीवनाचा स्वीकार करण्यास धडपडते. परंतु स्त्री जीवनसुध्दा सुंदर आहे. जेव्हा तिला कळते तेव्हा तिला खऱ्या जीवनाचा आस्वाद घ्यावासा वाटतो. ज.वि. पवार यांच्या 'बलिदान' यात येणारी विद्या, वनिता ही स्त्री पात्रे दलित स्त्रियांची प्रतिनिधीत्व करतात. याशिवाय योगिराज वाघमारे, भीमसेन देठे, विजय शिरसाठ, विजय काळे, नामदेव व्हटकर इ. कादंबरीकारांनी दलित स्त्रीची होणारी कुचंबना, तिच्यावर होणारा अन्याय आणि तिचा झालेला छळ आपल्या कादंबऱ्यांतून अधोरेखित केले आहे.

### ★ दलित नाटकातील स्त्रीचित्रण -

दलित नाटकाची गती ही सत्यशोधक चळवळीपासून सुरु होते. तमाशा, वगनाट्य, फार्स, दंढारी, प्रहसने इ. दलित नाटकाची त्याकाळची रुपे होत. दलित नाटकाचा प्रारंभ म. फुले यांनी 'तृतीय रत्न' (१८८५) या नाटकापासून झाला. सुरुवातीच्या काळातील दलित नाटकांमधून स्त्रीयांवर, दलित समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे अस्पृश्यतेचे दर्शन घडते. त्यानंतर दलित नाटकांवर आंबेडकरी विचारांचा प्रभाव जाणवतो. आंबेडकरांनी मांडलेली शिक्षण विषयक तत्वे अंगीकारणारी स्त्री दलित नाटकात दिसते. तसेच बौध्द धर्म स्वीकारणारी स्त्री ही जाणवते. मात्र हिंदू रुढी परंपरेच्या मानसिकतेतून बाहेर पडलेली स्त्री जाणवत नाही. 'प्रकाशपुत्र' या लक्ष्मण माने यांच्या नाटकातील 'सुमा' ही सुशिक्षित असून आंबेडकरी विचारांचा तिच्यावर प्रभाव असूनही ती आपल्या नवऱ्याला नोकरी लागावी म्हणून उपासतापास करते, याच नाटकातली 'आजी' सुध्दा जुन्या रुढी परंपरा पाळणारी आहे. भ.शि.शिंदे यांच्या 'काळोखाच्या गर्भात' यात बौध्द धर्म स्वीकारणाऱ्याच्या अगोदर गावातील सवर्णाच्या विहिरीवरील पाटातील पाणी दलित स्त्रीयांनी प्याल्यामुळे ते पाणी विटाळले म्हणून त्यांची गावातून धिंड काढली जाते. 'साक्षीपुरम' या रामनाथ चव्हाणांच्या नाटकात ही स्त्रियांवर असह्य अन्याय, अत्याचार केला जातो. याचे क्लेशकारक वर्णन येते.

दत्ता भगत यांच्या 'वाटा पळवाटा' नाटकातील स्त्रीदर्शन म्हणजे उच्च विद्याविभूषित स्त्रीची पहिली पिढी होय. दलित पुरुषाच्या प्रतिभेवर भाळलेल्या ब्राह्मण स्त्रीचे चित्रण आलेले आहे. प्रेमानंद गज्वी यांनी आपल्या नाटकातून दलित स्त्रीयांवरचा अन्याय मांडतांना पारंपारिकतेतून अंधश्रध्देतून तो अन्याय होतो, याचे चित्रण केले आहे.

थोडक्यात, अंधश्रध्दा जपणारी भोळी, श्रध्दाळू, चातुर्वर्ण्य समाज व्यवस्थेला बळी पडलेली स्त्री, सवर्णाचा अन्याय, अत्याचार बलात्कार सोसणारी स्त्री, आंतरजातीय विवाह करुन दलित तरुणांच्या जीवनात येणारी स्त्री, इ. दलित स्त्रीचे विविध रुपे दलित नाटकातून चित्रित झालेले आहे. एकूणच हिंदू मानसिकतेतून बाहेर न पडलेली स्त्री दलित नाटकात जाणवते.

### ★ निष्कर्ष -

१) दलित स्त्रीचा सवर्णांकडून जसा छळ झाला तसा स्वजातीय लोकांकडून ही त्रास सहन करावा लागला.
२) बौध्दधर्म स्वीकारणारी स्त्री मात्र हिंदू धर्माच्या रुढी परंपरेतून बाहेर पडली नाही.
३) दलित साहित्यातील स्त्री धर्मभोळी, नवससायास, उपासतापास करणारी जाणवते.
४) दलित साहित्यातील स्त्री डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी भारावलेली आहे.
५) दलित स्त्रीला उदर निर्वाहासाठी संघर्ष करावा लागतो. त्यामुळे मध्यमवर्गीय व सवर्ण स्त्रीयांच्या भावविश्वापेक्षा तिचे भावविश्व वेगळे आहे.
६) मध्ययुगीन काळातील दलित स्त्रीची फारच परवड झाली. आजही तिला अन्याय, अत्याचाराला तोंड द्यावे लागत आहे.

### संदर्भ -

१) दलित साहित्यातील स्त्रीचित्रण - डॉ. सुनिल चंदनशिव
२) दलित साहित्य काही विचार काही दिशा : कुंभार प्रकाश
३) दलित साहित्य चिकित्सा - सदा कुऱ्हाडे
४) दलितांचे आत्मकथने संकल्पना व स्वरुप - डॉ. वासुदेव मुलाटे
५) साहित्य प्रकृती आणि प्रवृत्ती - गंगाधर पानतावणे

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net